# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर

# सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

## परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या बैठकीचे

## **कार्यवृत्तांत**

वार: बुधवार, दिनांक ०५ मार्च, २०२५, सकाळी ११.०० वा.

**स्थळ : राष्ट्रमाता जिजाऊ मॉसाहेब व्यवस्थापन परिषद सभागृह,
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
॥ विद्यया संपन्नता ॥

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

## परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या बैठकीचा कार्यवृत्तांत

### बुधवार, दि. ०५ मार्च, २०२५ रोजी सकाळी ११.०० वा.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनिनिय २०१६ कलम ४७ (२) च्या तरतूदीनुसार परीक्षा व मूल्यमापन मंडळाची बैठक बुधवार दिनांक ०५ मार्च, २०२५ रोजी सकाळी ११.०० वा. राष्ट्रमाता जिजाऊ माँसाहेब व्यवस्थापन परिषद सभागृह येथे मा. कुलगुरु यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.

सदर बैठकीस उपस्थिती खालीलप्रमाणे होती.

| अ.क्र. | सदस्यांचे नांव | पद | उपस्थिती |
|---|---|---|---|
| १. | प्रा. प्रकाश महानवार,<br>मा.कुलगुरु, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर | अध्यक्ष | उपस्थित |
| २. | प्रा. (डॉ.) लक्ष्मीकांत ब. दामा<br>मा. प्र. कुलगुरु, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर | सदस्य | अनुपस्थित |
| ३. | डॉ. पी. एम. पवार<br>प्रभारी अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,<br>स्वेरीज कॉलेज ऑफ इंजिनियरींग, पंढरपूर | सदस्य | अनुपस्थित |
| ४. | डॉ. आर. एस. मेंते<br>प्रभारी सहयोगी अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,<br>संगणकशास्त्र संकुल,पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर | सदस्य | उपस्थित |
| ५. | डॉ. शिवाजी विश्वास शिंदे<br>प्रभारी अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा, डी.ए.व्ही. कॉलेज ऑफ कॉमर्स, सोलापूर | सदस्य | उपस्थित |
| ६. | डॉ. वसंत कोरे<br>प्रभारी अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा, संगमेश्वर महाविद्यालय, सोलापूर | सदस्य | उपस्थित |
| ७. | डॉ. आय. जे. तांबोळी<br>प्रभारी सहयोगी अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा, सोलापूर सोशल असोसिएशन आर्टस अॅन्ड कॉमर्स कॉलेज, सोलापूर | सदस्य | उपस्थित |
| ८. | प्राचार्य, डॉ. राजशेखर एस. हिरेमठ<br>प्रभारी अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा, श्री वीरतपस्वी चन्नवीर शिवाचार्य कॉलेज ऑफ एज्युकेशन, सोलापूर | सदस्य | उपस्थित |
| ९. | प्राचार्य, डॉ. शशिकांत तांबे<br>प्रभारी सहायोगी अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा, बळीरामदादा बनसोडे शिक्षणशास्त्र महाविद्यालय, चळे, ता-पंढरपूर | सदस्य | उपस्थित |

अहिल्यादेवी होळकर सोलापूर परीक्षा व मूल्यमापन

| | | | |
|---|---|---|---|
| १०. | डॉ. गजानन पळसे,<br>शिवाजी विद्यापीठ,<br>कोल्हापूर | सदस्य | अनुपस्थित |
| ११. | डॉ. राजेश राऊत,<br>डॉ. होमी भाभा राज्य विद्यापीठ, मुंबई | सदस्य | अनुपस्थित |
| १२. | मा. शिक्षण संचालक,<br>उच्च शिक्षण, संचालनालय, मध्यवर्ती इमारत, पुणे | सदस्य | अनुपस्थित |
| १३. | डॉ. श्रीकांत ग. अंधारे,<br>संचालक, परीक्षा व मूल्मयमापन मंडळ,<br>पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर. | सदस्य<br>सचिव | उपस्थित |

**स्वागत:**

संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ यांनी मा. अध्यक्ष व उपस्थित सर्व सन्माननीय सदस्य यांचे स्वागत केले.

**अनुपस्थिती:**

प्रा. (डॉ.) लक्ष्मीकांत ब. दामा, डॉ. प्रशांत पवार, डॉ. राजेश राऊत, डॉ. गजानन पळसे, व मा. शिक्षण संचालक यांच्या अनुपस्थितीची नोंद घेऊन मान्यता देण्यात आली.

बैठकीत खालीलप्रमाणे कामकाज झाले.

| विषय क्र. | विषय | विभाग |
|---|---|---|
| [०१] | दिनांक ०६ फेब्रुवारी, २०२५ रोजीच्या बैठकीचा इतिवृत्तांत वाचून कायम करणे व कार्यवाही अहवालाची नोंद घेणे. | परीक्षा व मूल्यमापन विभाग |
| ठराव: | दिनांक ०६ फेब्रुवारी, २०२५ रोजीच्या बैठकीचा इतिवृत्तांत वाचून खालील दुरुस्तीसह कायम करण्यात आला व ठरावांवर केलेल्या कार्यवाही अहवालाची नोंद घेण्यात आली. | |

**दि. ०६ फेब्रुवारी, २०२५ रोजीच्या बैठकीतील ठरावामध्ये खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात आले.**

| ठराव क्रमांक | मूळ ठराव | दुरुस्ती ठराव | विभाग |
|---|---|---|---|
| ०३ | नोंद घेण्यात आली | सदर प्रस्ताव व्यक्तीगत सादर केलेला आहे. परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या निर्णयानुसार व्यक्तीगत प्रस्ताव स्विकारता येत नाही म्हणून सदर प्रस्ताव अमान्य करण्याचे सर्वानुमते ठरले. | दीक्षांत विभाग |

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ ★ परीक्षा व मूल्यमापन मंडळ,

| विषय क्र. | विषय | विभाग |
|---|---|---|
| [ ०२ ] | **B.A. II Semester III SLR-MA-६५ Optional Marathi Paper-IV या विषयाच्या प्रश्नपत्रिकेतील चुकांच्या अनुषंगाने नियुक्त समितीचा अहवाल परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या विचारार्थ सादर.**<br><br>**टिपणी:-** दिनांक ०६/०२/२०२५ रोजीच्या मा. परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या बैठकीमध्ये ऑक्टो / नोव्हे २०२४ च्या परीक्षेतील दिनांक २४/१२/२०२४ रोजी झालेल्या बी. ए. भाग. २ सेमिस्टर ३ SLR-MA-६५ कविता आणि काव्यस्वाद तुकोबा (काव्यसंग्रह) राजेंद्र दास (BA२२१३२४) या प्रश्नपत्रिकेतील चुकीच्या अनुषंगाने सदरचा विषय परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या विचारार्थ ठेवण्यात आला होता. सदरच्या बैठकीतील विषय क्र. १० (६) च्या ठरावानुसार सत्यता पडताळणीकरीता पाच सदस्यांची समिती गठीत करण्यात आली होती. त्यानुसार या कार्यालयाचे पत्र क्र. पुअहोसोविसो/पवमूमं/२५४ दिनांक १२/०२/२०२५ रोजीच्या पत्रानुसार दिनांक १४/०२/२०२५ ठीक ११.०० वा. मा. संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ यांच्या दालनामध्ये बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये सदर समितीने सर्व कगदपत्रे तपासणी करून आपला अहवाल गोपनिय विभागाकडे बंद पाकीटामध्ये सादर करण्यात आला आहे.<br><br>उपरोक्त गठीत समितीचा अहवाल पुढील कार्यवाहीसाठी मा. परीक्षा व मूल्यामपन मंडळासमोर सादर करणे आवश्यक असल्याने सदरचा विषय आगामी परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या बैठकीसमोर ठेवण्यास मा. कुलगुरु महोदय यांनी मान्यता दिली आहे.<br><br>**सबब, B.A. II Semester III SLR-MA-६५ Optional Marathi Paper-IV या विषयाच्या प्रश्नपत्रिकेतील चुकांच्या अनुषंगाने नियुक्त समितीचा अहवाल परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या विचारार्थ सादर.** | गोपनीय विभाग/ परीक्षोत्तर |
| ठराव: | समितीच्या अहवालानुसार प्रश्नपत्रिकेमध्ये अर्थबोध न होणारे प्रश्न असल्यामुळे, काही विद्यार्थ्यांनी सदर प्रश्न सोडविले नाहीत व काही विद्यार्थ्यांनी सदर प्रश्न सोडविले आहेत, या कारणांमुळे B.A. II Semester III SLR-MA-६५ Optional Marathi Paper-IV या विषयाचे सर्व उत्तरपत्रिकेचे पुनर्मुल्यांकन खालीलप्रमाणे करुन घेण्याचे सर्वानुमते ठरले.<br>१) प्रश्न क्रमांक १ मधील वस्तुनिष्ठ (२, ४, ६ व ७) या प्रश्नांकरीता ज्या विद्यार्थ्यांनी सोडविला आहे व ज्यांनी सोडविला नाही अशा सर्व विद्यार्थ्यांना सरसकट ४ गुण देण्यात यावे.<br>२) प्रश्न क्रमांक ३ हा दिर्घोत्तरी प्रश्न (१० गुण असलेला) ज्या विद्यार्थ्यांनी सोडविला आहे व ज्यांनी सोडविला नाही अशा सर्व विद्यार्थ्यांना सरसकट ७ गुण देण्यात यावे.<br>३) प्रश्न क्रमांक ४ हा दिर्घोत्तरी प्रश्न (१० गुण असलेला) ज्या विद्यार्थ्यांनी सोडविला आहे व ज्यांनी सोडविला नाही अशा सर्व विद्यार्थ्यांना सरसकट ७ गुण देण्यात यावे.<br>वर नमूद विषयाचे पुनर्मुल्यांकन करीत असताना संबंधित प्रश्नांकरीता यापूर्वी दिलेल्या गुणांमध्ये (अ.क्र. १, २ व ३) नुसार पुनर्मुल्यांकन करावे.<br>४) विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन विभागाकडील परीक्षोत्तर (Post Exam Section) विभागाने तीनही मध्यवर्ती मूल्यमापन केंद्रावरुन सदर विषयाच्या उत्तरपत्रिका एकत्रित करुन, त्या उत्तरपत्रिकेच्या Second Slip त्या त्या उत्तरपत्रिकेला स्टॅपल कराव्यात. अधिष्ठाता व सहयोगी अधिष्ठाता यांच्याकडून संबंधित विषयाचे पॅनल घेऊन त्यांचेकडून उक्त नमूद सूचनेनुसार उत्तरपत्रिकेंचे पुनर्मुल्यांकन दि. १५ मार्च, २०२५ पर्यंत पूर्ण करुन निकाल जाहिर करावा असे सर्वानुमते ठरले.<br>५) उक्त नमूदप्रमाणे प्रश्नपत्रिकेमध्ये झालेल्या चुकीच्या अनुषंगाने गोपनीय सर्व्हिस प्रोव्हायडरला आवश्यक ती समज देऊन सदर प्रश्नपत्रिकेच्या डी.टी.पी. चे देयक अदा करण्यात येऊ नये असे सर्वानुमते ठरले. | |

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ ★ परीक्षा व मूल्यमापन मंडळ

| विषय क्र. | विषय | विभाग |
| --- | --- | --- |
| [०३ ] | **श्री. गणेश डोंगरे, अधिसभा सदस्य, पु. अ. हो. सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांनी श्री. ढोबळे लक्ष्मण कोंडीबा आणि श्री. चोप्रा महेश यांच्या पीएच.डी. कोर्स वर्क पेट-८ साठी विद्यापीठाने घेतलेल्या मुख्य परीक्षेच्या निकालाला स्थगिती देणेबाबतचे निवेदनाच्या अनुषंगाने गठीत समितीचा अहवाल परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या विचारार्थ सादर.**<br><br>**टिपणी:-** श्री. गणेश डोंगरे, अधिसभा सदस्य, पु. अ. हो. सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांनी अर्जानुसार श्री. ढोबळे लक्ष्मण कोंडीबा आणि श्री. चोप्रा महेश यांच्या पीएच.डी. कोर्स वर्क पेट-८ साठी विद्यापीठाने घेतलेल्या मुख्य परीक्षेच्या निकालाला स्थगिती देणेबाबतचा दि.२१/०९/२०२४ रोजीचा ईमेलद्वारा प्राप्त झालेले निवेदन सादर केले असता. विभागाकडील दि.११/१२/२०२४ रोजीच्या फेरसादर टिपणीअन्वये सदर निवेदनास अनुसरुन मा.कुलगुरु यांच्या मान्यतेअन्वये समिती गठित करण्यात आली. तसेच गठीत समिती यांच्या सर्वसाधारण बैठकीच्या शिफारशीनुसार संबंधित महाविद्यालय यांच्याकडून परीक्षेविषयी कागदपत्रे मागणी केल्यानंतर विद्यापीठास प्राप्त कागदपत्रे गठीत समितीसमोर सादर केली असता, दि.१७/०२/२०२५ रोजीचा गठीत समितीचा अंतिम अहवाल सोबत जोडला आहे.<br><br>**सबब, श्री. गणेश डोंगरे, अधिसभा सदस्य, पु. अ. हो. सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांनी श्री. ढोबळे लक्ष्मण कोंडीबा आणि श्री. चोप्रा महेश यांच्या पीएच.डी. कोर्स वर्क पेट-८ साठी विद्यापीठाने घेतलेल्या मुख्य परीक्षेच्या निकालाला स्थगिती देणेबाबतचे निवेदनाच्या अनुषंगाने गठीत समितीचा अहवाल परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या विचारार्थ सादर.** | पीएच. डी. कक्ष |
| **ठराव:** | उक्त नमूदकामी गठीत समितीने दि. १७/०२/२०२५ व दि. ०४/०३/२०२५ रोजी दिलेला अहवाल स्विकारला असून त्यानुसार श्री. ढोबळे लक्ष्मण कोंडीबा आणि श्री. चोप्रा महेश यांच्या पीएच.डी. कोर्स वर्क पेट-८ साठी विद्यापीठाने घेतलेल्या परीक्षेचा निकाल जाहिर करावा असे सर्वानुमते ठरले. | |

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ ★ परीक्षा व मूल्यमापन मंडळ,

| विषय क्र. | विषय | विभाग |
|---|---|---|
| [०४] | **मा. प्राचार्य,ग्लोबल व्हिलेज कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, बोरामणी, ता.द.सोलापूर, जि. सोलापूर यांचे दि.२५/०२/२०२५ रोजीचे पत्र विचारार्थ.**<br><br>**टिपणी**:- प्रस्तुत विद्यापीठाच्या ऑक्टोंबर/नोव्हेंबर, २०२४-२५ च्या सर्व अभ्यासक्रमांच्या परीक्षा सुरु असून झालेल्या परीक्षांच्या उत्तरपत्रिका ह्या परीक्षेनंतर दुसऱ्या दिवशी मध्यवर्ती मूल्यमापन केंद्रास सादर करणे अनिवार्य आहे. परंतु ग्लोबल व्हिलेज कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, बोरामणी, ता.द.सोलापूर, जि. सोलापूर या महाविद्यालयाने त्यांचे कर्मचारी प्रा. हरिदास पंढरीनाथ घनश्याम यांनी दि.३१/०१/२०२५ रोजीचे पेपर हे दि.०१/०२/२०२५ रोजी दयानंद कॉलेज ऑफ आर्टस् ॲन्ड सायन्स, सोलापूर या कॅप सेंटरवर जमा करणे बंधनकारक असताना देखील सदरील पेपर कॅप सेंटरवर जमा केलेले नाहीत व ते मावशीच्या यजमानांचे दु:खद निधन झाल्याने ते वैराग लागेले. तसेच याबाबत त्यांनी प्राचार्यांना देखील पेपर जमा करण्याबाबत इतर प्राध्यापक किंवा महाविद्यालयातीलकर्मचारीयांना पाठविण्याबाबत सांगितले नाही.<br>उपरोक्त बाब गंभिर स्वरुपाचे व परीक्षेच्या कामातील गांभिर्य विचारात घेता, विद्यापीठाकडून पत्र क्रमांक पुअहोसोविसो/पवमुमं/मध्यवर्ती मूल्यमापन केंद्र/३०५, दि.२४/०२/२०२५ अन्वये सदरप्र करणी वस्तुनिष्ठ अहवाल सादर करणेबाबत मा. प्राचार्य, ग्लोबल व्हिलेज कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, बोरामणी यांना कळविण्यात आले होते. त्यास अनुसरुन त्यांनी खालीलप्रमाणे अहवाल सादर केलेला आहे.<br>• **वस्तुनिष्ठ अहवाल:** दि.३१/०१/२०२५ रोजी बी.ए.भाग २, सत्र ३ (नविन) (न्युसीबीएससी) परीक्षा ऑक्टोंबर, नोव्हेंबर २०२४ विषय-वैकल्पिक पॉलिटिकल सायन्स पेपर ४, मॉडर्न इंडियन पॉलिटिकल थॉट बी.ए. २२१३५० एसएलआर-एमए ११४ झालेल्या परीक्षांचे उत्तरपत्रिका दि.०१ फेब्रुवारी २०२५ रोजी कॅपसेंटर दयानंद महाविद्यालय सोलापूर येथे आमच्या महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांकडून जमा करावयाचे राहून गेले. याबद्दल मी दिलगीर आहे.<br>दि.०१ फेब्रुवारी २०२५ रोजी आमच्या महाविद्यालयातील प्रा.पंढरीनाथ हरिदास हे कॅप सेंटरवर पेपर जमा करायचे काम करीत होते. नेमके त्यादिवशी कॅप सेंटरकडे जातानाच त्यांची गाडी दोड्डी येथे पंक्चर झाल्यामुळे त्यांना पाच मिनिटे विलंब झाला. त्यामुळे ते तेथील संबंधित व्यक्ती श्री. श्रीकांत कुंभारे यांच्या कॅप सेंटर वरिल कर्मचारी यांना विनंती करुन जमा करुन घेण्याबाबत सांगितले असता, त्यांना उद्या रविवार सकाळी येण्यास सांगितले तर २ फेब्रुवारी, रविवार संबंधित कर्मचारी श्री. हरिदास यांनी श्री. श्रीकांत कुंभारे यांनी तुमच्या उत्तर पत्रिका स्विकारु शकत नाही. व इथून पुढे तुम्ही विद्यापीठ जमा करा व पुढील सत्रातील पेपर बार्शी येथे जमा करा असे प्रा. हरिदास सर यांना हे पेपर तुम्ही विद्यापीठात जमा करा असे निक्षुन सांगितले असल्याने त्यांनी पुन्हा सोमवारी विद्यापीठात गेले परंतु वास्तविक पाहता त्यादिवशी श्री.हरिदास यांनी विद्यापीठात जाऊन उत्तरपत्रिका जमा करणे बंधनकारक होते असे असतानाही त्यांनी जमा केले नाहीत. त्यांना विचारल्यानंतर त्याच वेळेला त्यांच्या मावशीच्या यजमानांचे दु:खद निधनाची वार्ता समजल्यानंतर ते वैरागला निघून गेले त्यांनी त्यांच्या कर्तव्यात कसूर केल्याचे आम्हाला | परीक्षोत्तर विभाग |

| | |
|---|---|
| | निदर्शनास आज आलेले आहे. कारण त्यांनी त्या दु:खद घटनेनंतर प्राचार्यांना सांगून उत्तर पत्रिकेचा गट्टा त्यांच्या स्वाधीन करुन इतर प्राध्यापकांना किंवा कर्मचाऱ्याला विद्यापीठात पाठवून द्यावे, असे सांगून त्यांनी जायला हवे होते. परंतु तसे न करता ते निघून गेले. शिवाय त्यांनी याबद्दल आल्यानंतर देखील त्यांनी याबद्दल काहीच न सांगितल्यामुळे आम्ही अनभिज्ञ राहिलो.<br><br>जेव्हा विद्यापीठाकडून पत्र आले त्यावेळेस उत्तरपत्रिका विद्यापीठात जमा झाले नसल्याचे आम्हाला कळून आले. तेव्हा प्रा.हरिदास यांना विचारल्यानंतर त्यांनी सांगितले की, सर हे विसरुन महाविद्यालयात संगणक विभागात माझ्याकडेच अनावधानाने राहून गेल्याचे कबुली देवून तो उत्तर पत्रिकेचा गठ्ठा आज सकाळी दि.२५/०२/२०२५ रोजी आमच्याकडे सुपूर्द केला.<br><br>आता त्यांच्यावर महाविद्यालयाच्या प्रशासनाने योग्य ती कारवाई करेलच. तेव्हा प्रा.हरिदास यांच्या चुकीमुळे, विस्मरणामुळे उत्तरपत्रिका महाविद्यालयातच त्यांच्याजवळ राहिल्याने सदर उत्तरपत्रिका कॅप सेंटरवर जमा करावयाची परवानगी मिळण्याबाबत विनंती केलेली आहे. तसेच यापूर्वी मार्च/एप्रिल २०२४ मधील परीक्षेच्या बी.एस्सी. भाग-२, सेम. ४ Zoology-VII च्या उत्तरपत्रिका उशिरा जमा केल्याने दि १८/१२/२०२४ रोजी झालेल्या बैठकीत परीक्षा प्रमाद समितीने ग्लोबल व्हिलेज कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, बोरामणीचे प्राचार्य व कॅप डायरेक्टर यांना प्रत्येकी १०,०००/- इतका दंड आकारला होता. सदरची बाब आपल्या माहितीस्तव.<br><br>वास्तविक पाहता, विद्यापीठ परीक्षेचे काम हे अत्यंत गोपनीय व वेळेवर होणे आवश्यक असताना ग्लोबल व्हिलेज कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, बोरामणी यांनी त्याच्या परीक्षा केंद्रावरील उत्तरपत्रिका वेळेत मध्यवर्ती मूल्यमापन केंद्रावर जमा केल्याचे दिसून येत नाही. सदर बाबही अतिशय गंभिर व परीक्षेच्या कामकाजाला छेद देणारी आहे.<br><br>**सबब, मा. प्राचार्य,ग्लोबल व्हिलेज कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, बोरामणी, ता.द.सोलापूर, जि. सोलापूर यांचे दि.२५/०२/२०२५ रोजीचेपत्र विचारार्थ.** |
| **ठराव:** | १) ऑक्टोबर/नोव्हेंबर २०२४ मध्ये मा. प्राचार्य, ग्लोबल व्हिलेज कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, बोरामणी, ता.द.सोलापूर, जि. सोलापूर या परीक्षा केंद्रावर झालेल्या बी.ए.भाग २, सत्र ३ (नविन) (न्युसीबीएससी) च्या वैकल्पिक पॉलिटिकल सायन्स पेपर क्रमांक- ४ (मॉडर्न इंडियन पॉलिटिकल थॉट) (SLR MA-११४) या विषयाचे ५४ उत्तरपत्रिका विधि विभागाच्या मदतीने पंचनामा करुन जमा करुन घेण्यात याव्यात. सदर उत्तरपत्रिकेचे मूल्यांकन करुन निकाल जाहिर करावा असे सर्वानुमते ठरले.<br>२) ग्लोबल व्हिलेज कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, बोरामणी, ता.द.सोलापूर, जि. सोलापूर या महाविद्यालयाकडून सदर बाबतीत वारंवार गंभिर चुका होत असल्याकारणाने सदर महाविद्यालयाच्या असंलग्नीकरणाची कार्यवाही करण्याकरीता संलग्नता विभागाकडून मा. विद्यापरिषदेसमोर विषय ठेवण्यास सर्वानुमते शिफारस करण्यात आली. |

मा. कुलगुरू तथा अध्यक्ष महोदयांच्या परवानगीने येणारे आयत्या वेळेचे विषय:

| विषय क्र. | विषय | विभाग |
|---|---|---|
| [०५(१)] | **ऑक्टोबर/नोव्हेंबर २०२४ या परीक्षेचे निकाल वेळेत घोषित करण्याची बाब विचारार्थ.**<br><br>टिपणी:- ऑक्टोबर/नोव्हेंबर २०२४ च्या झालेल्या परीक्षांचे निकाल वेळेत लागणे आवश्यक आहेत. तसेच सदर निकालाच्या अनुषंगाने येणारे अडचणी सोडविणे व त्या अनुषंगाने विहीत कार्यवाही पूर्ण करुन मुदतीत निकाल घोषित होणे आवश्यक आहे.<br><br>**सबब, ऑक्टोबर/नोव्हेंबर २०२४ या परीक्षेचे निकाल वेळेत घोषित करण्याची बाब विचारार्थ.** | **परीक्षोत्तर विभाग** |
| **ठराव:** | ऑक्टो/नोव्हेंबर २०२४ या परीक्षेचे निकाल वेळेत घोषित करण्याच्या अनुषंगाने येणाऱ्या विविध अडचणींचे निराकरण करुन निकाल मुदतीत घोषित करणेकामी मा. प्र-कुलगुरु महोदयांच्या मार्गदर्शनाखाली सर्व विद्याशाखांचे अधिष्ठाता व सहयोगी अधिष्ठाता यांची संबंधित विद्याशाखेकरीता टास्कफोर्स समिती गठीत करण्याचे सर्वानुमते ठरले. सदर समिती उत्तरपत्रिकेचे मूल्यांकन गतीमान करण्याकरीता विहीत कार्यवाही करेल. याकरीता परीक्षा विभाग आवश्यक ती संपूर्ण माहिती टास्कफोर्स समितीस वेळोवेळी देईल असे सर्वानुमते ठरले. | |

अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर ★ परीक्षा व मूल्यमापन मंडळ,

मा. कुलगुरु व उपस्थित सर्व सन्माननीय सदस्यांचे आभार मानून मा. अध्यक्षांच्या परवानगीने बैठक संपल्याचे संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ तथा सदस्य सचिव यांनी जाहीर केले व बैठक समाप्त झाली.

05/03/25

**डॉ. श्रीकांत ग. अंधारे**
संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळतथासदस्य सचिव

5/3/25

**डॉ. प्रकाश महानवार**
मा. कुलगुरु तथा अध्यक्ष,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ.